स्वतंत्र भारत 27-2-2019

# ती आणि मी

..होय, आजच्या जोडप्यांना 'स्पेस' ही लागतेच ! उभयतांपैकी प्रत्येक जण आपापल्या सुख-दु:खाचं, आवडीनिवडीचं कौटुंबिक जीवन कसं असावं, याबद्दलचं काही ना काही अपेक्षांचं ओझं पाठीवर घेऊनच बोहल्यावर चढत असतो. 'स्पेस' जर मिळाली नाही तर उभयतांची कुंचबणा होते. स्पेसचा एक अर्थ 'पोकळी' असा आहे. त्यांना पोकळी हवी असते, असं म्हणायचं का? एक रिक्तपणाची हौस असते, असं समजायचं का? मग या पोकळीत काय भरायचं? समज-गैरसमज, अपेक्षा-अपेक्षाभंग, तत्त्व-तत्त्वाचे प्रश्न, पीळ आणि तिढा, रोष व दोष, शंका-कुशंका, संशय-पिशाच्च, दूषित पूर्वग्रह?



''नाही हो, तसं नाहीच?'' मग, स्पेसचा दुसरा अर्थ 'अंतर' आहे. अंतर कापायचं की वाढवायचं? परस्परांनी विभिन्न दिशांकडं तोंड करुन जगायचं ठरवलं किंवा चालायचं ठरवलं तर? हे जमण्यासारखं नाही.

''अहो, हे अर्थ मूळ चुकीचेच आहेत.'' 'स्पेस' या शब्दाचा जो अर्थ आजची जोडपी घेतात, तो असा- 'थोडी मोकळीक असावी, थोडी सवड असावी, थोडी उसंत असावी, थोडी फुरसत असावी, थोडं स्वत:मध्ये स्वत:ला मग्न राहण्याची संधी असावी, मुभा असावी- सर्वच बाबतींत.'

''ती हो कशाला?''

जेव्हा 'तुमचे' आणि 'आमचे' शिल्लकच राहत नाही, तेव्हा आहे ते आणि करावयाचे ते 'आपले' होते. 'तुमचे- आमचे' राहत नाही. म्हणून स्पेसची गरजच नाही. एकात्म होऊन जगणाऱ्या जोडीलाच हा अनोखा अनुभव येऊ शकेल!

मनुष्याच्या जीवनातील महत्त्वाचे तीन टप्पे... जन्म, लग्न आणि मृत्यू ! पहिला व तिसरा टप्पा आपल्या हाती नसलेला, मधला टप्पा म्हणजे लग्न आणि त्यातून पुढच्या पिढीला सजवणारी, घडवणारी, निभावणारी सहचारिणी, अर्धांगिनी, एक जीवनसाथी. तिच्या निवडीची संकल्पना, आयुष्यातील बहुमोल क्षण! त्यानंतर सप्तपदी. दोन आत्म्यांचा संगम. ते केवळ दोन जीवांचं मीलन नसून, नवसृष्टीनिर्मितीचं बीजारोपण. कितीही म्हटलं तरी विश्वाचं पूर्ण रूप हे एका विस्तारित कुटुंबाचंच आहे. हा त्यामागील लांबच्या पल्ल्याचा विचार... त्यानंतर आयुष्याला वळण द्यायचं हे रंगभूमी की रणभूमी समजून? रंगभूमी, रणभूमी या नादात सुरु राहतं विचारचक्र!

चांगला, उत्तम व मंगल विचार हा स्वमनाचा उत्कृष्ट आविष्कार असतो. चालण्यासाठी वाट असते, वाटेसाठी चालणं नसतं. जीवनाच्या वाटेवर पायानं चालणारे केवळ अंतर कापतात, तर विवेकानं चालणारे 'ध्येय' गाठतात. ही वाटचाल गाठीला पैसे बांधून किंवा ऐहिक सुखसाधनांच्या मागे धावून पूर्ण होत नसते. तर त्यासाठी समतोल विचारांची शिदोरी बांधावी लागते. उभयतांचा वैचारिक, भावनिक प्रवास होतो. प्रश्नोत्तरं, एकमेकास पाहणं, न्याहाळणं, निरीक्षण-आकलन तद्वतच स्वत:बद्दलच्या कल्पनांची ओळख, त्यातून होणारं अंतरात्म्याचं दर्शन यांवर आधारित पोक्तपणे घेतलेला निर्णय हा भारतीय लग्नसंस्काराचा पाया असतो.

भावी जीवनसाथीनं दिलेला सुयोग्य प्रतिसाद, त्यातून घडलेल्या होकाराचा चमत्कार! या चमत्काराच्या साक्षात्काराचं दर्शन अशिक्षित; पण व्यवहारी आईपुढे मांडणं, स्वजनांना पटवणं, समजावणं, त्यातून होकार मिळवणं म्हणजे शिक्षण-संस्काराचा विजय, शील-चारित्र्याचा विजय. या प्रक्रियापध्दतीतून व रीतीभातीतून जाणं इष्टही असतं आणि आवश्यकही. त्यातूनच अंकुरतो दोन अनोळखी आत्म्यांचा साताजन्माचा प्रवास!

असं म्हणतात, की पत्नी उंबरठ्यापर्यंत, बांधव स्मशानापर्यंत, शरीर चितेपर्यंत, परंतु पाप-पुण्य, आचार-विचार हे कायमचेच माणसाच्या आत्म्याशी निगडित असतात. आदर्श विचार व्यवहारात उतरवणं ही जीवनातील खरी लौकिकता. अशी लौकिकता जगलेल्या एका साध्या-सरळ; पण विचारी सहचारिणीच्या आयुष्याची ही अक्षरगाथा. तसं पाहिलं तर या कथनाला संपूर्ण जैन परिवाराच्या अनोख्या प्रवासाची गाथाही म्हणता येईल. या प्रवासाला सर्वार्थानं अर्थ देणाऱ्या नायिकचं नाव आहे कांताबाई.. तिची ही कहाणी... माझ्या लेखणी... (क्रमशः)

- भवरलाल जैन यांनी लिहिलेल्या 'ती आणि मी' पुस्तकातून

स्वतंत्र भारत 28-2-2019

# ती आणि मी

"**जी**वनाला रंगभूमी समजायचं की रणभूमी, हा खरा निर्णय तुलं करायला पाहिजे"- माझा सोबती पंढरी मला म्हणाला. नाशिकनगरीच्या रविवार कारंजा चौकातून एका घोड्याच्या टांग्यामध्ये बसून रेल्वे स्टेशनकडे निघालो होतो.

लग्नयोग्य वय झालेलं असल्यानं आई-वडिलांना दिलेल्या वचनानुसार मी अनुरूप जीवनसाथीच्या शोधात निघालो होतो. सांगून आलेल्या दोन-तीन स्थळांच्या भेटीगाठी घेऊन कुणालाच ताटकळत न ठेवता, झटपट आठ दिवसात घेतलेल्या निर्णयानुसार जिथं जमण्यासारखं नाही, तिथं नकारही कळविण्याचा निर्धार केला होता. जिथं जमण्यासारखं असेल त्या स्थळी पुढील बोलणी मार्गी लावायची, हेही ठरलं होतं. पहिली मुलगी नाशिकची, ती एका सिद्धहस्त, प्रतिष्ठासंपन्न, नावाजलेल्या वकिलाची मुलगी होती. पहिल्या भेटीगाठीत त्यांच्या मुलीत आणि माझ्यात झालेल्या चर्चे ला उद्देशून माझा मित्र पंढरीनाथ सावेने त्याचे विचार अत्यंत समर्पकपणे वर उध्दृत केलेल्या विधानात गुंफले होते. त्याच्या उद्‌गारांमुळे मीही अंतर्मुख झालो.



केवळ चर्चाच रंगली असं नव्हतं, तर चर्चासत्रंच रंगलं होतं! वकिली थाटात मी सुध्दा त्याची उलटतपासणी सुरु केली,

"पण काय रे पंढरी, आयुष्यात पैसा, संपत्ती, घर, वऱ्हाड, त्यांच्या सुखसोयी, मानमरातब - एकूणच संपन्नता यालाही काही महत्त्व आहे की नाही?"

पंढरी उत्तरला, "हे बघ, तुझ्या लग्नात किती आणि कोणते वऱ्हाडी-बाराती आले होते, कोणते, कसे बँडबाजे लागले होते, आहेर म्हणून तुला काय मिळालं, या सगळ्या गोष्टी वर्ष-सहा महिन्यांत इतिहासजमा होतील."

पंढरी माझ्या चेहऱ्यावरचे हावभाव तपासत असावा. टांगा ताल धरून व्यवस्थित चालत होता. आजूबाजूला काय घडतंय, किती वेळ लागतोय याचं भान आम्हापैकी कोणालाच नव्हतं.

"पंढरी, मलाही या सर्व गोष्टींमध्ये काही तथ्य वाटत नाही. मला वाटतं, मी एक नवीन इतिहास घडवायला निघालो आहे. त्या जडणघडणीत मला सदैव हसतमुख राहून मदत करेल, अशाच सहचारिणीच्या मी शोधात आहे."

"मग निर्णय झाला म्हणायचा. ही मुलगी तुझ्या जीवनाला रणभूमीचं स्वरूप देईल. तू पाहिलंस का, तुझ्या प्रत्येक प्रश्नाचं उत्तर तिनं तुला प्रतिप्रश्न विचारूनच दिलं. हर सवालका जवाब सवालसेही मिला!"

आम्ही दोघंही काहीसे हसलो. परस्परांच्या डोळ्यांत भविष्याच्या संकल्पना उभ्या होत्या. जीवनाला रंगभूमी समजायचा निर्णय झालेला होता. रंगभूमीवरील दोन पात्रांपैकी एक पात्र मीच होतो. दुसऱ्या पात्राच्या शोधात निघालेल्या या नायकाच्या डोक्यात विचारांचं काहूर माजलं होतं. समाज, सामाजिक प्रतिष्ठा, आई-वडिलांचे सनातनी विचार या सर्वांचं एक थैमान मनात चाललं होतं.

७५ वर्षांची परंपरा बाजूला ठेवून उभ्या कुटुंबात पहिलाच ग्रॅज्युएट झालेला हा नायक म्हणजे स्वतःच्या धर्मपत्नीच्या शोधात स्वतःच निघालेला आगळावेगळा माणूस. त्या वेळच्या आमच्या सामाजिक व कौटुंबिक रीतिरिवाजांना डावलूनच असलं साहस करायला निघाला होता.

शिक्षणाबरोबर हे येणारच. केवळ विचार आणि स्वातंत्र्य नव्हे; तर 'विचार स्वातंत्र्य' देखील शिक्षणाची पहिली फलश्रृती असायला हवी. आई-वडिलांनी, माझ्या एकत्र कुटुंबातील थोरल्या मंडळींनी तेवढा अधिकार मात्र मोठ्या मनाने मला बहाल केला होता.

"तू आधी मुली बघून ये, त्यानंतर तुला पसंत पडलेल्या मुलींनाच बघायला आम्ही जाऊ. आम्ही परत आल्यानंतर चर्चा करून काय करायचं ते ठरवू." ह्या करारानुसार मला वागायचं होतं. म्हणून नाशिकला जाण्यापूर्वी आमच्या वाकोद खेड्याजवळील तोंडापूर गावच्या गर्भश्रीमंत शेटजींची मुलगी पाहण्याचा कार्यक्रम मी आटोपलेला होता. (क्रमशः)

- भवरलाल जैन यांनी लिहिलेल्या 'ती आणि मी' पुस्तकातून